वाचले:-

१) सहा.संचालक, शिक्षु प्रशिक्षण मंडल(पश्चिमी क्षेत्र), मुंबई यांचे दिनांक ०१/०१/२०१८ चे पत्र.

२) सहा.संचालक, शिक्षु प्रशिक्षण मंडल(पश्चिमी क्षेत्र), मुंबई यांचे दिनांक ०२/०२/२०१८ चे पत्र.

३) श्री. सतिश शर्मा, सहा. संचालक शिक्षु प्रशिक्षण मंडल (पश्चिम क्षेत्र) मुंबई यांचे कडील दिनांक २९/०१/२०१८ चा ई-मेल.

४) कामगार आणि रोजगार मंत्रालय, यांचे कडील विद्यावेतनाबाबत अधिसुचना दिनांक १९ डिसेंबर २०१४.

५) प्रशासन विभागाकडील दिनांक:- ०१ /०३/२०१८ रोजीचा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८
क्रमांक:-प्रशा/११/कावि/१४२/२०१८
दिनांक:- ०१/०३/२०१८

विषय:- शिक्षु प्रशिक्षणार्थी अधिनियम १९६१ अतंर्गत प्रशिक्षणार्थी शिक्षु उमेदवारांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नेमणूक करणेबाबत.

आदेश,

मा. सहा.संचालक व सहा.प्रशिक्षणार्थी सल्लागार, शिक्षु प्रशिक्षण मंडळ, मुंबई - २२ यांचेकडील उपरोक्त वाचले क्रमांक-१ ते ३ चे पत्रान्वये तांत्रिक शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेल्या पात्र उमेदवारांची पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सन २०१७ करीता शिक्षु प्रशिक्षणार्थी म्हणून रिक्त असणा-या जागांवर शिक्षु उमेदवारांची नेमणूक करणेस कळविले आहे. त्याअनुषंगाने खालील उमेदवारांना सन २०१७ करीता त्यांचे नांवासमोर नमुद केलेल्या पदावर रुजू तारखेपासून १ वर्षे प्रशिक्षण कालावधीसाठी उपरोक्त क्रमांक ४ नुसार खालील तक्त्यातील त्यांच्या नावासमोरील क्र. ६ चे स्तंभमध्ये नमूद केलेल्या विद्यावेतनावर शिक्षु उमेदवार म्हणून नेमणूक देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | प्रशिक्षणाचा व्यवसाय | प्रशिक्षण कालावधी | मासिक विद्यावेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | माने अक्षय राजु | वि.जा. (अ) | स्थापत्य अभियंता | १ वर्ष | ४९८४ |
| २ | सरवार सतिश सोमनाथ | खुला | स्थापत्य अभियंता(डिप्लोमा) | १ वर्ष | ३५४२ |
| ३ | नरूटे कल्याण आबासाहेब | खुला | स्थापत्य अभियंता(डिप्लोमा) | १ वर्ष | ३५४२ |
| ४ | लांडगे निखिल विनोदराव | इ.मा.व. | स्थापत्य अभियंता(डिप्लोमा) | १ वर्ष | ३५४२ |
| ५ | पाटील नयन रविंद्र | इ.मा.व. | स्थापत्य अभियंता(डिप्लोमा) | १ वर्ष | ३५४२ |
| ६ | नगवटे आशिष माधवराव | एकाकी पद | विद्युत अभियंता | १ वर्ष | ४९८४ |
| ७ | धांडोरे विकी भिमराव | खुला | विद्युत अभियंता(डिप्लोमा) | १ वर्ष | ३५४२ |
| ८ | गुंजीटे संतोष गंगाराम | खुला | विद्युत अभियंता(डिप्लोमा) | १ वर्ष | ३५४२ |
| ९ | घोडे दिपाली सुनिल | अनु. जमाती | विद्युत अभियंता(डिप्लोमा) | १ वर्ष | ३५४२ |

वरील शिक्षु उमेदवारांना नि:संदिग्धपणे समज देण्यात येतो की, प्रस्तुतच्या आदेशान्वये करण्यात आलेली नेमणूक ही पुर्णत: प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आली असून, नेमणूक कालावधीत खालील अटी व शर्ती त्यांच्यावर बंधनकारक राहतील.उमेदवारांनी सदरचा आदेश प्राप्त झालेपासून ७ दिवसांचे आत प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशासन विभागात रुजू होऊन विहीत नमुन्यातील करारनामा सादर करावा. सदर मुदतीत ते रुजू न झाल्यास त्यांची नेमणूक संपुष्टात येईल.

१) नेमणूकीचे पदावर रुजू होताना शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता, जातीविषयक व शाळा सोडल्याचा दाखला यांची मूळ प्रत व त्यांच्या प्रत्येकी २ प्रमाणित सत्यप्रती (झेरॉक्स) आणाव्यात.प्रशिक्षणार्थीने रुजू होताना नव्याने काढलेला आपल्या छायाचित्राच्या (फोटोच्या) ३ कॉपीज सोबत आणाव्यात त्याशिवाय रूजू करुन घेतले जाणार नाही.

२) प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थीना ऍप्रेंटीस ऍक्टनुसार वर्षात १२ दिवस किरकोळ रजा व १५ दिवस वैद्यकीय रजा देय राहतील. या व्यतीरीक्त अन्य फायदे व सवलती अनज्ञेय राहणार नाहीत.

३) प्रशिक्षण कालावधीमध्ये नियमितपणे कामावर हजर राहणे आवश्यक आहे आणि नेमून दिलेला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागेल प्रशिक्षण कालावधीमध्ये विनापरवाना गैरहजर राहील्यास १ वर्षे पुर्ण

होण्यापूर्वीही प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आणला जाईल.व ऍप्रेंटीस ऍक्टनुसार तसेच आपण लिहून दिलेल्या संविदेनूसार योग्य ती कारवाई करण्यात येईल आणि दिलेले विद्यावेतन वसुल केले जाईल.

४) सदर आदेशान्वये करण्यात आलेल्या नेमणूका या पूर्णत: प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आलेल्या आहेत. प्रशिक्षणाचा विहीत कालावधी पूर्ण होताच प्रशिक्षणार्थी म्हणून केलेली नेमणूक संपुष्टात येईल. त्यामुळे या उमेदवारांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर हक्क सांगता येणार नाही अथवा हक्क राहणार नाही.

५) शिक्षु प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संविदा नोंदणी करुन यापूर्वी अन्य कोठेही प्रशिक्षणार्थी म्हणून काम केले असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव संविदा नोंदणी न झाल्यास या कार्यालयामार्फत कोणतेही विद्यावेतन व अन्य फायदे न देता त्वरीत कार्यमुक्त केले जाईल व उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

६) शिक्षु उमेदवारांनी मासिक विद्यावेतन त्यांचे बँक खातेवर जमा झाल्या नंतर त्या पासबुकची झेरॉक्स प्रत प्रशासन विभागास कार्यमुक्त होईपर्यंत दरमहा सादर करावी.

सही/-
**सहाय्यक आयुक्त, प्रशासन**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

प्रति-
सर्व संबंधीत शिकाऊ उमेदवार

प्रत-१) लेखा विभाग २) मुलेप विभाग ३) संबंधित विभाग

२/-शिकाऊ उमेदवारांना आपले नियंत्रणाखालील विभागामध्ये सविस्तर नेमणूका देऊन त्याबाबतचा अहवाल सादर करावा. नियुक्त शिक्षु उमेदवारांचे प्रशिक्षण कालावधीत त्यांना तांत्रिक कामाव्यतिरीक्त इतर कोठल्याही प्रकारची कामे देण्यात येऊ नये. प्रत्येक महिण्याच्या ५ तारखेपर्यंत प्रशिक्षणार्थींना दिलेल्या विद्यावेतनाबाबतची माहिती प्रत्येक महिन्याप्रमाणे स्वतंत्र हजेरी व विद्यावेतन जमा केल्याच्या पुराव्यार्थ बँक पासबुकच्या छायांकित प्रतिसह दर तिन महिण्याला एकत्रित सादर करावी. तसेच विनापरवाना गैरहजर राहणारे उमेदवारांना आपले अधिकारात नोटीसा बजावून खुलासा मागवून त्यासह अहवाल पाठवावा. उमेदवाराच्या गैरहजेरीत पत्रव्यवहारासंबंधीत त्यांचा पत्ता किंवा भ्रमणध्वनीचा वापर करून सतत गैरहजर असल्यास उमदेवारांशी विचारणा करण्यात येऊन उमेदवार प्रशिक्षणासाठी इच्छुक नसल्यास तसा अहवाल इकडील कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावा तसेच सदरच्या उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच त्यांना त्वरीत कार्यमुक्त करावे, कोणत्याही परीस्थितीत मुदत संपताच प्रशिक्षणाकरीता त्यांना कामावर ठेऊ नये.

४) मा. सहा. संचालक शिक्षु प्रशिक्षण मंडळ, एटीआय कॅम्पस,
व्ही.एन.पुरव मार्ग,सायन,मुंबई-२२.

**प्रशासन अधिकारी – २**
**प्रशासन विभाग**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.